# COLLEGE GARDEN





















# GARDEN DEVELOP BY COLLEGE AT VADGAON



# TREE PLANTATION AT SAMBHAGINAGER, KOLHAPUR


















# **TREE PLANTATION AT** KAGAL















# GARDEN DEVELOPMENT
# AT RUIKAR COLONY,KOLHAPUR










महाराष्ट्र टाइम्स

**८ ऑगसट २०१८**



गोखले कॉलेजमधील गार्डनिंग अभ्यासक्रमातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करताना संस्थेचे सचिव प्रा. जयकुमार देसाई. सोबत प्राचार्य डॉ. ए. बी. गडकरी, प्रा. सचिन मोहिते आदी

# गोखले कॉलेजच्या गार्डनर अभ्यासक्रमाचा निकाल १०० टक्के

कोल्हापूर टाइम्स टीम

गोपाळकृष्ण गोखले महाविद्यालयातील सर्टिफिकेट कोर्स इन गार्डनर या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा निकाल शंभर टक्के लागला. यशस्वी विद्यार्थ्यांना शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रा. जयकुमार देसाई यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना प्रा. देसाई म्हणाले, गार्डनिंग क्षेत्रात नव्या संधी खुल्या होत आहेत. या कोर्सच्या माध्यमातून नोकरी व व्यवसाय करण्यासाठी संधी आहे. पर्यावरणविषयक नव्या संकल्पनावर आधारीत रोजगार उपलब्ध होणार असल्याने या क्षेत्रातील कौशल्यविकासातून विद्यार्थी करिअर करू शकतात. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. ए. बी. गडकरी, गार्डनिंग विभागाचे समन्वयक प्रा. सचिन पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास दौलतराव देसाई, प्रशासन अधिकारी डॉ. मंजिरी मोरे, प्रा. पी. के. पाटील, उपप्राचार्य प्रा. एस. एच. पिसाळ, प्रा. एस. एन. मोरे, प्रा. ए. टी. गुरव, प्रा. एम.एम. कामत, आर. व्ही. गायकवाड आदी उपस्थित होते.

Source: - https://epaper.timesgroup.com/Olive/ODN/MaharashtraTimes/get/MTKOL-2018-08-08/image.ashx?kind=block&href=MTKOL%2F2018%2F08%2F08&id=Ar0140700&ext=.png&ts=20180807234203

Posted 8th August 2018 by Prin. M. R. Desai Library

Labels: गोखले गार्डनिंग कोर्स सर्टिफिकेट वितरण

महाराष्ट्र टाइम्स
२७ ऑक्टोबर २०१५

# सायकलशी आहे 'दोस्ती'

**शाळेत असताना त्यांची सायकलशी दोस्ती झाली. पुढे कॉलेजात गेल्यावरही त्यांनी कोण काय म्हणेल याची फारशी पर्वा केलेली नाही. सायकलवरचं आपलं प्रेम त्यांनी कायम ठेवत ती कॉलेजमध्येही त्याच थाटात आणली. असेच काही सायकलवीर. सायकल हा मजेशीर पर्याय. ते सोयीचं आणि परवडणारं वाहन असं या तरुणाईला वाटतं. अनेक कॉलेजांतील मुले फक्त जिम आणि क्लासला जाण्यासाठी सायकलचा वापर करतात.**

विनायक जरांडे
सीसीआर, गोखले कॉलेज

CCR
कॉलेज क्लब रिपोर्टर



सायकल म्हणजे बहुउपयोगी, हलकं, विना कटकटीचं, तब्येत सांभाळणारं, प्रदूषण टाळणारं, आनंद देणारं लोकप्रिय वाहन. अलीकडच्या काही दशकांत मोटारसायकलमधील नवनवीन शोधामुळे सायकलचा वापर कमी झाला. अलीकडे फक्त शाळकरी मुलांकडे सायकल हा ट्रेंड बदलून कॉलेजला जाणारी तरूणाई, ऑफिसला जाणारे अनेकजणही सायकलशी दोस्ती करताना दिसू लागले आहेत.

दिखावूगिरीसाठी बाइक घेऊन धूर काढत, आवाजाचे प्रदूषण करत चक्कर मारण्याऐवजी सायकलचा वापर म्हणजे पर्यावरणाचे रक्षणाचा एक प्रयत्नच. तसे पाहिले तर मुले कॉलेजात गेल्यावर सायकलला हात लावताना संकोचतात असे चित्र काही वर्षांपूर्वी दिसत होते. मात्र सध्या बहुतांश तरुण मुले, मुलींच्या हाती सायकल दिसते. अर्थात प्रत्येकाची सायकल वापरण्यामागची कारणे, हेतूही वेगवेगळे. पेट्रोलचे पैसे वाचवणे, बसचे पैसे वाचावे यांसह प्रदूषण कमी करण्यासह वाहतुक कोंडीचा विचार, तिथे वाया जाणारा वेळ, जिमचा खर्च यांसह फक्त हौस हेही कारण सायकल वापरण्यामागचे आहे.

अलीकडे अनेकदा बॉलीवूडमधील सेलिब्रेटीही सिनेमात सायकल चालवतानाही दिसले आहेत. मग त्याचाच आधार घेऊन जवळच्या ठिकाणच्या ट्रिपसाठी सायकलच बरी म्हटली जाते. सायकलमध्येही गिअरच्या सायकलीला सध्या अधिक पसंती आहे. डिस्क ब्रेकची क्रेझही सध्या तरुणाईत दिसते. काही भारतीय बनावटीच्या तर काही परदेशातून आणलेल्या सायकलीही कोल्हापूरच्या रस्त्यावर धावताना दिसतात. तीन-साडेतीन हजार रुपयांपासून सुरू होणारे सायकलचे मार्केट अगदी पाच लाखापर्यंत आहे हेदेखील दिसते. आजकाल तरूणाईकडे हिरो, हर्क्युलस, हिप्पो, ॲटलस, ॲवॉन, दास, अंबर, हिरोगेट, बीएसए, हॅमिल्टन या कंपनीच्या रेंजर, थ्रीलर, सायबर, फायरफॉक्स, टर्मिनेटर, मॅकवॉन, लेडीबर्ड सायकलची क्रेझ दिसून येते.

मी गेली चार वर्षे सायकल वा
एकतर व्यायाम होतोच, शिवा
पैशाचीही बचत होते. अनेकदा सक
नसल्यामुळे अडचण होते. त्यामुळे स
पडते. दररोज व्यायाम करण्यापेक्षा
तास सायकल चालवावी, असे मला
- प्रि

सायकल चालवायला मी कधी कंटा
सायकलमुळे शरीर तंदुरुस्त राहते, प
होतात. सायकलचा वापर करताना
वाटत नाही. पाचगावहून गोखले कॉ
नसल्यामुळे विद्यार्थ्यांनी सायकलचा
- रा

मी रोज कंदलगाव ते आमचे कॉलेज
सायकलवरून करतो. मला इतर काम
करण्यासाठीही सायकलची मदत होते
बससेवेवर अवलंबवून रहावे लागत न
जास्त उपयोगी येते.
- शा

# 18-1-20 NO VAICAL DAY









**20-1-2018**